# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

### राष्ट्रीय सेवा योजना विभाग



पुढारी | २

## भीमाशंकर अभयारण्यात स्वच्छता अभियान

भीमाशंकर येथील अभियानात सहभागी झालेले स्वयंसेवक.



लोकमत पुणे, गुरुवार, दि. १३ सप्टेंबर २०१८

## वनसचेतन शिबिराचे आयोजन

**भीमाशंकर अभयारण्य : स्वच्छता राबवत निसर्गाबद्दलची कृतज्ञता व्यक्त**

लोकमत न्यूज नेटवर्क

भीमाशंकर अभयारण्यात वनसचेतन शिबिरात सहभागी विद्यार्थी.

**राजगुरुनगर :** येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने भोरगिरी ते भीमाशंकर अभयारण्य परिसरात वन सचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन मंगळवारी (दि. ११) करण्यात आले. यात २१५ स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले. शिबिराचे हे सलग सहावे वर्ष होते. विद्यार्थ्यांना निसर्गातील जैवविविधतेची माहिती व्हावी आणि पर्यटकांकडून अभयारण्य परिसरात टाकला जाणारा प्लॅस्टिकचा कचरा जमा व्हावा, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता.

विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात भटकंती करून दुर्मिळ असा 'शेकरू' प्राणी व 'ब्लू मॉरमॉन' फुलपाखराची ओळख करून घेतली. दुर्मिळ औषधी वनस्पती, प्राणी यांच्या जाती-प्रजातींची माहिती करून घेतली. भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसरातील प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या इत्यादी घनकचरा जमा केला.

विद्यार्थ्यांनी भीमा नदीच्या उगमामधील पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनची मात्रा शास्त्रीय पद्धतीने तपासली. ती १२ पीपीएम एवढी आहे. शुद्ध पाण्यातील ऑक्सिजनची कमीत कमी मात्रा ८ पीपीएम आवश्यक असते. विद्यार्थ्यांना सह्याद्रीच्या डोंगररांगांची प्राकृतिक रचना, हवामान, मृदा, जलप्रणाली आणि भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसराची धार्मिक व ऐतिहासिक माहिती प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी दिली. विद्यार्थ्यांनी भीमाशंकर मंदिर परिसरात स्वच्छतेचे महत्त्व सांगणारे पथनाट्य सादर केले.

वनसचेतन शिबीर व स्वच्छता अभियानाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश पाळूंज, प्रा. नीता डोंगरे यांनी केले. या शिबिरात उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. नीलेश बारणे, प्रा. अनुराधा गवळी, प्रा. मोनिका कोल्हे, प्रा. प्रियांका राक्षे, प्रा. काजल शहा, प्रा. मीनल वाव्हाडे व प्रशासकीय सेवक संतोष मुळूक, अमोल बारणे उपस्थित होते.

सकाळ
शुक्रवार, १४ सप्टेंबर २०१८ | ३

# राजगुरू महाविद्यालयातर्फे वनसचेतन शिबिर

**राजगुरुनगर, ता. १३ :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भोरगिरी ते भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन ११ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. यात २१५ विद्यार्थी सहभागी झाले होते.



**भीमाशंकर अभयारण्य : वनसचेतन शिबिरात सहभागी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थी.**

शिबिराचे हे सलग सहावे वर्ष होते. अभयारण्य परिसरात भटकंती करून विद्यार्थ्यांनी निसर्गातील जैवविविधतेची माहिती करून घेतली. पर्यटकांकडून भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसरातील प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या जमा केल्या. विद्यार्थ्यांना सह्याद्रीच्या डोंगररांगांची प्राकृतिक रचना, हवामान, मृदा, जलप्रणाली आणि भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसराची धार्मिक; तसेच ऐतिहासिक माहिती प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी दिली. विद्यार्थ्यांनी भीमाशंकर मंदिर परिसरात स्वच्छतेचे महत्त्व सांगणारे पथनाट्य सादर केले.

वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश बाळुंज प्रा. नीता डोंगरे यांनी केले.

दरम्यान, विद्यार्थ्यांनी भीमा नदीच्या उगमामधील पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनची मात्रा शास्त्रीय पद्धतीने तपासली. ती १२ पीपीएम एवढी आहे. शुद्ध पाण्यातील ऑक्सिजनची कमीत कमी मात्रा ८ पीपीएम आवश्यक असते.

प्रभात पुणे, शुक्रवार, दि. १४ सप्टेंबर २०१८

# भीमाशंकर येथील 'भीमे'चे पाणी शुद्ध

## ऑक्सिजनची मात्रा १२ पीपीएम : राजगुरुनगर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केली तपासणी

राजगुरुनगर, दि. १३ (प्रतिनिधी) – भीमाशंकर येथे भीमा नदीच्या उगमामधील पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनची मात्रा हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शास्त्रीय पद्धतीने तपासली. शास्त्रीयदृष्ट्या शुद्ध पाण्यातील ऑक्सिजनची कमीत कमी मात्रा ८ पीपीएम आवश्यक असते मात्र, तपासणी अंती ती १२ पीपीएम एवढी आढळली असून ही मात्रा जेवढी जास्त तेवढे पाणी शुद्ध असल्याचे महाविद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भोरगिरी ते भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यात सुमारे २१५ स्वयंसेवक विद्यार्थी- विद्यार्थिनी सहभागी झाल्या होते. त्यावेळी ही तपासणी करण्यात आली. या शिबिराचे हे सहावे वर्ष आहे. विद्यार्थ्यांना निसर्गातील जैवविविधतेची माहिती व्हावी आणि पर्यटकांकडून अभयारण्य परिसरात टाकला जाणारा प्लॅस्टिकचा कचरा जमा व्हावा हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता. भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसरातील प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या आदी घनकचरा जमा केला.



भीमाशंकर (ता. खेड) : येथे परिसराची राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वनचेतना शिबिरात पथनाट्य सादर करून जनजागृती केली.

**स्वच्छता अभियानात सुमारे २१५ स्वयंसेवक झाले सहभागी**

**विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून दिला सामाजिक संदेश**

### दुर्मीळ औषधी वनस्पतींची घेतली माहिती

शिबिरातील विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात भटकंती करून दुर्मीळ असा 'शेकरू' प्राणी व 'ब्लूमॉरमॉन' फुलपाखराची ओळख करून घेतली. दुर्मीळ औषधी वनस्पती, प्राणी, पक्षी जाती-प्रजातींची माहिती करून घेतली.

वनसचेतन शिबीर व स्वच्छता अभियानाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश बाळुंज प्रा. नीता डोंगरे यांनी केले. या शिबिरात उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, डॉ. प्रभाकर जमदाडे, प्रा. निलेश आरणे, प्रा. अनुराधा गवळी, प्रा. मोनिका कोल्हे, प्रा. प्रियांका राळे, प्रा. काजल शाह, प्रा. मोनल बोन्द्रे व प्रशासकीय सेवक संतोष मुळूक, अमोल वाणी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना सह्याद्रिच्या डोंगररांगांची प्राकृतिक रचना, हवामान, मृदा, जलप्रणाली आणि भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसराची धार्मिक व ऐतिहासिक माहिती प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी दिली. विद्यार्थ्यांनी भीमाशंकर मंदिर परिसरात स्वच्छतेचे महत्त्व सांगणारे पथनाट्य सादर करीत भीमाशंकर अभयारण्यात वनभोजन घेतले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख